(२९४) 20150622170816412७

कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बोरी ता.अकोले जि.अहमदनगर
द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक : कोपबं २००७/७२९/प्र.क्र.(४२६/२००७) खारभूमी

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २२/२/२००८

पहावे :- १) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्र.गोमपाविम/तां-५/कोपबं बोरी सुप्रमा/३७२५/२००७/दिनांक २४.५.२००७

प्रस्तावना :-

कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बोरी ता.अकोले, जि.अहमदनगर या योजनेस शासन निर्णय क्रमांक कोपबं-१०९३/४२१/९३/खारभूमी दिनांक २४.६.९४ अन्वये रुपये ४६.८२ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता व शासन निर्णय क्रमांक लपायो-१७९६/९९०/३२६/९६ खारभूमी दिनांक ३१.१.२००२ अन्वये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सद्यःस्थितीत बंधा-याचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. योजनेच्या स्विकृत निविदेमध्ये प्रस्तंभासाठी दगडी बांधकाम प्रस्तावित केले होते परंतु शासन परिपत्रक दिनांक ९.७.२००२ अन्वये दगडी बांधकामाऐवजी संधानकाचा वापर करण्यात आला. बंधा-याचे पायाचे दगडी बांधकाम तसेच अंत्याधार व गुंतावा भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. जादा दराची निविदा, दरसूचीच्या दरातील वाढ, अभियांत्रिकी बदलामुळे वाढ, अनुषंगिक खर्चातील वाढ इ.कारणामुळे योजनेच्या किंमतीत वाढ अपेक्षित असल्याने सन २०००-२००१ च्या दरसूचीवर आधारित रुपये ११८.०६ लक्ष किंमतीच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडून शासनास प्राप्त झाला व तो शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

आता या शासन निर्णयान्वये को.प.बंधारा बोरी ता.अकोले, जि.अहमदनगर या योजनेस सन २०००-२००१ वर्षाच्या दरसूचीवर आधारित सुधारित केलेल्या पाक्कलनानुसार कामाच्या एकूण अंदाजित रुपये १,१८,०६,३३०/- (रुपये एक कोटी, अठरा लक्ष, सहा हजार, तीनशे तीस फक्त) यापैकी कामासाठीच्यार्थ रुपये ९४,३१,७०३/- व रुपये २,३७,५०,३७/- अनुषंगिक खर्च या रकमेस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. उपशिर्षवार तरतूदीचा गोषवारा सोबत परिशिष्टामध्ये देण्यात येत आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्रमांक आय मुख्य लेखाशिर्ष "४७०२ लहान पाटबंधा-यावरील भांडवली खर्च ८००-इतर खर्च पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (चार) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद भाग भांडवली अंशदान योजनांतर्गत

(संगणक संकेतांक क्रमांक ४७००/४९९-७)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे उपलब्ध होणा-या तरतुदीतून परस्पर भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००९/(१२०/०९) [illegible] दिनांक २८.५.०९ मधील तरतुदीनुसार आंतर वित्त सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

या योजनेस प्रदान करण्यात आलेली द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता ([illegible] /०८) अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा.च.हुमणे)
शासनाचे अवर सचिव

प्रतिलिपी,

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा) मुंबई / नागपूर
वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग (१४६१), मंत्रालय, मुंबई
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक
आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
उप सचिव (लपा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर
कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, अहमदनगर
अवर सचिव (खारभूमी) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
उप अभियंता (खारभूमी) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
अर्थसंकल्प शाखा १/२ (२ प्रती) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
लपा-२ (२ प्रती) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
जिल्हाधिकारी, अहमदनगर
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (२ प्रती)
संगणक कक्ष, मंत्रालय, मुंबई ३२
खारभूमी कार्यासन, संग्रहार्थ.

C:\DOCUME~1\[illegible]0483\MYDOCU~1\Meahergaon-order-HHP.doc-1.doc

शासन निर्णय क्रमांक कोपबं २००७/७२९/(४१६/२००७) खारभूमी दिनांक २२.२.२००८ चे परिशिष्ट

को.प.बंधारा बोरी ता.अकोले, जि.अहमदनगर अंदाजपत्रकाचा गोषवारा

क्रमांक	शिर्ष / उपशिर्ष	एकूण (रुपये लक्ष)	एकूण रुपयात
१.	'ए' प्राथमिक	४९९००	४९९००
२.	'बी' (भूसंपादने)	२५२०४	२५२०४
३.	'सी' मुख्य कामे	९१५८३८३	९१५८३८३
४.	डी विमोचक	--	--
५.	ई-फॉल	--	--
६.	एफ आरएचटी वर्क्स	--	--
७.	जी पूल (सीटी क्रॉसिंग)	--	--
८.	एच एस्केप	--	--
९.	'के' इमारती	६११७४	६११७४
१०.	एल मातीकाम	--	--
११.	एम वृक्षारोपन	--	--
१२.	'ओ' संकीर्ण	८०००	८०००
१३.	'पी' देखभाल	६७२६२	६७२६२
१४.	'आर' दळणवळण	६१३७०	६१३७०
	कामाप्रित्यर्थ किंमत	९४,३१,२९३	९४,३१,२९३
	अनुषंगिक खर्च (२५.२५ टक्के भूसंपादन वगळून)	२३,७५,०३७	२३,७५,०३७
	योजनेची एकूण किंमत	**१,१८,०६,३३०**	**१,१८,०६,३३०**

ठळक वैशिष्टये

योजनेची सिंचन क्षमता	४९२ हेक्टर
नियोजित पाणीसाठा	९५० स.घ.मी.
पाणीसाठयाची प्र.स.घ.मी.किंमत (रु.)	१२४२८ < १२५६३ (मापदंडात बसते.)
लाभव्यय गुणोत्तर	१.८३ > १.०० (मापदंडात बसते)

C:\Documents and Settings\hp230483\My Documents\Maahegoen-order-HHP.doc-1.doc